महाराष्ट्र शासन

कृषि ,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

५ वा मजला, दालन क्र.५२० (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.

क्रमांक: दुवियो-२०२२ /प्र.क्र.३१/पदुम-१० | दिनांक- ०३/०५/२०२३

प्रति,

१. आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास विभाग,वरळी, मुंबई-१८.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, आरे
३. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना

विषय:- आरे सरिता केंद्र वाटपासंदर्भात

संदर्भ:- १. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांचे पत्र क्र. आदुव/मु.का.अ./स्टॉलवाटप/एम्वोईओ/३४८७, दि.२६.४.२०२३
२. शासनाचे समक्रमांकाचे दि.२७/९/२०२२ व दि.२९/९/२०२२ चे पत्र

उपरोक्त विषयांकित प्रकरणी बृहन्मुंबई दूध योजनेअंतर्गत असलेल्या आरे सरिता केंद्रावाटपासंदर्भात असलेली नियमावलीस संदर्भाधीन दि.२७.९.२०२२ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर नियमावलीतील तरतुदीनुसार अर्जदार किमान पदवीधर असणे आवश्यक होते. सदर अर्हतेत बदल करुन अर्जदार किमान १२ वी पास असण्याची अर्हता संदर्भाधीन दि.२९.९.२०२२ च्या पत्रान्वये विहीत करण्यात आली आहे.

सदर नियमावलीच्या आधारे आरे सरिता केंद्रांच्या वाटपासाठी जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले असता प्राप्त झालेल्या ११८५ अर्जांपैकी फक्त ३४ अर्जदार पात्र ठरले आहेत. वाटपासाठी ५९ केंद्र उपलब्ध आहेत. उपलब्ध आरे केंद्रांची संख्या व पात्र अर्जदारांची संख्या विचारात घेऊन शैक्षणिक अर्हतेत बदल करणे आवश्यक आहे. यास्तव पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

१. शासन पत्र क्र. दुवियो-२०२२ /प्र.क्र.३१/पदुम-१०, दि.२९.९.२०२२ चे पत्र रद्द समजण्यात यावे.

२. मुळ नियमावलीतील नियम क्र.२.१, २.२, २.६ मध्ये आता पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२.२ अर्जदार बेरोजगार असणे आवश्यक आहे. अर्जदाराचा स्वतःचा व्यवसाय नसावा तसेच अर्जदार खाजगी किंवा सरकारी नोकरदार नसावा.

२.६ अर्जदारास मराठी तसेच हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

अ.रा.चुरी

(अ.रा.चुरी)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी :- प्रधान सचिव (पदु). यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.